**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३३ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. परशराम बंडू पाटील<br>३१५, खेडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,<br>गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर | गैरहजर |

अपीलकर्त्यांने दि. २१.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये मागणी केल्यानुसार परिपूर्ण माहिती मिळाली असल्याचे मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22.७.२००८

( विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.नागनाथ नामदेव जाधव
मु.पो.कुरुल, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सोलापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१४५, रेल्वे लाईन, सोलापूर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ३३४-२९८ / सोलापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | ३१.१.२००८ |

३.उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.नागनाथ नामदेव जाधव
मु.पो.कुरुल, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी, सोलापूर प्रतिनिधी श्री.ए.बी.चासकर

(१)**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क,
१४५, रेल्वे लाईन, सोलापूर श्री.ए.बी.चासकर
(२)**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.बाबासाहेब भाऊसाहेब वाघमोडे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २८.२.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १६.५.२००६ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | १५.६.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १५.७.२००६ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

एकूण ५० रिक्त पदांपैकी २४ पदे भरली आहेत. ही २४ पदे कोणत्या पध्दतीने व केव्हा भरली गेली (सरळ भरतीने अथवा कोणत्या भरती प्रक्रियेने भरली). यापैकी महिलांसाठी किती आरक्षण ठेवण्यात आलेले होते. अनुकंपा तत्त्वावरील किती उमेदवार भरले. सविस्तर माहिती मिळावी.

## विवेचन

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर या कार्यालयातील अनुकंपा जवान भरतीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.नागनाथ नामदेव जाधव यांनी दोन अर्जांद्वारे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले. राज्य उत्पादन शुल्क, रेल्वेलाईन, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून रिक्त जागा भरण्याची कार्यवाही झाली असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती घ्यावी, असे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक श्री.ए.बी.चासकर यांनी श्री.जाधव यांना कळविले. श्री.जाधव यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर याच्याकडे केलेले अपील त्यांनी फेटाळले. याच अनुषंगाने भरती प्रक्रियेची माहिती मागणारा अर्ज श्री.जाधव यानी केला. त्यावर मिळालेल्या उत्तराविरुध्द त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. 'संबंधित कार्यालयातील २४ जवानांच्या भरतीविषयक प्रक्रियेची पूर्ण माहिती श्री.जाधव यांना द्यावी, तसेच सहाय्यक आयुक्त, मागासवर्गीय कक्ष, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून अनुशेषांतर्गत पदांचा रोस्टर तपासून घेऊन तो मंजूर करण्याबाबत तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी,' असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिला.

अनुकंपा तत्त्वाखालील जवान म्हणून आपल्याला उत्पादन शुल्क खात्यात नोकरी मिळावी ही श्री.जाधव यांची मुख्य मागणी आहे व त्या अनुषंगाने विविध पातळ्यांवर ते पत्रव्यवहार करीत आले आहेत. उच्च न्यायालयातही त्यांनी अपील केले होते, परंतु उच्च न्यायालयाने त्यांचे म्हणणे ग्राह्य धरले नाही, असे अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर श्री.ए.बी.चासकर यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे. चुकीची माहिती दिल्याचा श्री.जाधव यांचा आक्षेप योग्य नाही. तेव्हा असलेल्या परिस्थितीप्रमाणे योग्य माहिती

दिली, तसेच आवश्यक तेथे सुधारित माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय श्री.बाबासाहेब भाऊसाहेब वाघमोडे व श्री.ए.बी.चासकर यांनी सांगितले. उत्पादन शुल्क कार्यालयात केवळ पाच कर्मचारी, तसेच विधानसभा अधिवेशन, आयुक्तालय, मुंबई इत्यादी ठिकाणच्या माहितीच्या कामासाठी त्या त्या ठिकाणी जावे लागणे यामुळे माहिती देण्यास काही प्रमाणात विलंब झाला, असे श्री.चासकर यांनी नमूद केले.

श्री.जाधव यांना हवी असलेली माहिती देण्यात आल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन दिसते. अनुकंपा तत्त्वावरील नेमणूक ही त्यांची मुख्य मागणी आहे. आपल्या तक्रारीची चौकशी करुन आपल्यावरील अन्याय दूर करावा, असे प्रतिपादन श्री.जाधव यांनी आयोगापुढे लेखी व तोंडी केले. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अनुकंपा भरतीबाबतची प्रक्रिया, तसेच अनुशेषांतर्गत पदांचा रोस्टर मंजूर करुन घेण्याबाबतच्या केलेल्या कार्यवाहीची माहिती श्री.जाधव यांना निःशुल्क देऊन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, सोलापूर यांनी आयोगाला दि.१०.८.२००८ पर्यंत अहवाल सादर करावा.

पुणे
दि.३१.५.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

सोलापूर[illegible]५-७

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३४ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. देवीदास नारायण देशपांडे<br>रा. मलिग्रे, ता. आजरा, जि. कोल्हापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक भूमि अभिलेख, आजरा, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर, जि. कोल्हापूर |

अपीलकर्ता श्री. देवीदास नारायण देशपांडे यांनी मौजे मलिग्रे येथील गट क्र. ६२५ पैकी बिनशेती झालेल्या १२०० चौ.मी. पैकी ४०५ चौ.मी. क्षेत्राचा नकाशा व मिळकतपत्रिका होण्याबाबत मागणी केली होती.

मौजे मलिग्रे, ता. आजरा, जि. कोल्हापूर या गावचे चौकशीचे काम सन १९८७ साली झालेले असल्याने मिळकत उतारा, नकाशा तयार करणे ही बाब या कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रातील नसल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडे अपील करणे आवश्यक असल्याचे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी लेखी कळविले. अधीक्षक, भूमि अभिलेख, कोल्हापूर यांच्याकडील अपील क्र. ६७/२००८ दि. १९.३.२००८ च्या अपील निर्णयात सूचित केल्याप्रमाणे माहिती दि. ३.४.२००८ रोजी पुरविण्यात आलेली आहे.

वरील तीनही घटकांमधील चर्चेनुसार अपीलकर्त्याची मागणी केलेली ही 'माहिती' नसून / कार्यवाहीची आहे, व ती कायद्यानुसार अपील करुन निर्णय लावून पूर्ण करावयाची असल्याचे अपीलकर्ते यांना स्पष्ट करण्यात आले. सदर विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नसल्याचेही त्यांनी मान्य केले. अपिलीय प्राधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही पूर्ण करण्याची हमी अपीलकर्त्यास दिली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३५ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. मायाप्पा सुबराव पुजारी<br>मु.पो.उदगाव, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सरकारी कामगार अधिकारी, इचलकरंजी,<br>जि. कोल्हापूर | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक कामगार आयुक्त, इचलकरंजी,<br>जि. कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. मायाप्पा सुबराव पुजारी यांनी आर्थिक कमर्शिअल प्रा. लि. या संस्थेसंदर्भातील एकूण दहा मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, इचलकरंजी, जि. कोल्हापूर यांच्याकडे मागितली होती.

अपीलकर्त्यास दि. ४.२.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दहा मुद्दयांवर खुलासा केला आहे. मूळ अर्जातील संक्षिप्त विचारणा पाहता उत्तर मुद्देसूद दिल्याचे दिसते. मात्र अपीलकर्त्यास समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सदरची माहिती ही निरीक्षक अहवालाचे आधारे देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्यांची मूळ मागणी ही त्यांच्या तक्रारीनुसार कार्यवाहीची असल्याने त्यांना अपेक्षित असल्याप्रमाणे माहिती देणे उपलब्ध अभिलेखानुसार शक्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

उपलब्ध कागदपत्रे, निवेदने पाहता मूळ मागणी प्रमाणे देय माहिती देण्यात आल्याचे दिसते. त्यानुसार अपीलकर्त्याने सक्षम अधिकारी / न्यायालयात दाद मागणे आवश्यक दिसते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३१ .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३६ / कोल्हापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. अब्दुल गुलामनबी पटेल<br>१२, ग्रीन व्ह्यू अपार्टमेंट, दत्त मंदिराजवळ,<br>रमणमळा, कोल्हापूर- ४१६ ००३ |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, जि. कोल्हापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, शिरोळ, जि. कोल्हापूर |

अपीलकर्ता श्री. अब्दुल गुलामनबी पटेल यांनी दि. ३१.८.२००७ रोजी दाखल केलेल्या अर्जान्वये मौजे जैनापूर, ता. शिरोळ येथील गट नंबर २२८.ब च्या RTS/KOP/५५९/२००४ दि. २४.१२.२००४ च्या आदेशाप्रमाणे 'जैसे थे' ची कार्यवाही झाली अगर कसे, डायरी नबंर १२०, ९३७, १०३२, ८२, १०९४. व १३८५ ते १२८८, तसेच ७/१२ पत्रकी २२८.ब गट नंबर जैनापूर प्रकरणी आजची पीकपाहणीची परिस्थिती, अशी माहिती मागितली होती. त्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी सांगितले.

उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता अप्पर आयुक्तांच्या आदेशानुसार अधिकार अभिलेखात अंमल घेण्यात आला किंवा कसे याबाबतची माहिती श्री. पटेल मागत आहेत. त्यासाठी त्यांनी माहितीच्या अधिकारान्वये सहा अर्ज व चार अपिले केली. पुनःपुन्हा तोच विषय श्री. पटेल मांडत आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, शिरोळ यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. मूळ बाब ही प्रशासकीय कार्यवाहीची असून त्याबाबतच्या सद्यस्थितीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी त्यांना दिली आहे. श्री. पटेल यांची मुख्य मागणी कार्यवाही पूर्ण करण्याबाबतची असून ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. तथापी जन

माहिती अधिकारी यांनी एक महिन्यात अप्पर आयुक्तांच्या आदेशाच्या अंमलबजावणीची कार्यवाही पूर्ण करीत असल्याचे लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहितीच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी यांनी कबूल केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. 22.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. बाबासाहेब कृष्णा गायकवाड<br>मु.पो.पुरंदावडे, ता. माळशिरस, जि.सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत पुरंदावडे,<br>ता.माळशिरस, जि. सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी, पंचायत समिती,<br>माळशिरस, जि. सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. बाबासाहेब कृष्णा गायकवाड यांनी मौजे पुरंदावडे ग्रामसभेची दि. [illegible]-२००६ ची प्रोसीडिंग नक्कल व हजेरीपट, सन २००५-०६ मध्ये मागासवर्गीयांवर किती खर्च केला [illegible] केला, पात्र लाभार्थी यादी, सन २००५-०६ मध्ये १० टक्के महिला व बालकल्याणवर किती खर्च केला व पात्र लाभार्थी यादी, सन २००५-०६ मध्ये हजेरीत काटेरी झाडे तोडणे, रस्ते करणे व दुरुस्तीसाठी किती खर्च कोठे केला व त्याची मजुरांची यादी इ. माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक पुरंदावडे यांच्याकडे मागितली होती. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेविका सौ. [illegible] शेख यांनी विहित मुदतीत नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविली. ती अपूर्ण व चुकीची असल्याच्या कारणावरून श्री. गायकवाड यांनी अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माळशिरस, जि. सोलापूर यांच्याकडे अपील केले. अपीलकर्त्याच्या विनंतीनुसार अपिलाच्या सुनावणीसाठी पाच वेळा संधी व मुदतवाढ देऊनही ते उपस्थित राहिले नाहीत. सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याने मुदतवाढीचे अर्ज देऊन सुनावणीकामी वेळकाढूपणा केला. तसेच दिलेली माहितीही परत पाठविली असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले. अपीलकर्ता यांनी मूळ अर्जात मागितलेल्या माहिती व्यतिरिक्त मुद्दे अपिलात उपस्थित केले असल्याने व मूळ माहिती दिलेली असल्याने अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत

समिती, माळशिरस, जि. सोलापूर यांनी अपील फेटाळले, असेही त्यांनी नमूद केले आहे. मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीव्यतिरिक्तची माहिती अपिलात मागणे हे योग्य नाही. माहिती परत पाठविणे, सुनावणीला पाच वेळा तारखा देऊनही उपस्थित न राहणे, दिलेली माहिती नाकारणे या स्वरूपाची स्वतः मागितलेल्या माहितीबाबतची अपीलकर्त्याची कृती हेतूविषयी प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३९ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. अजित बाबासो सासने<br>१८७० बी, संभाजीनगर, कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्रभारी जल अभियंता,<br>कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. अजित बाबासो सासने यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रभारी जल अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडे १९ मुद्दयांची पाणी पुरवठा व ड्रेनेज विभागासंबंधीची माहिती मागितली होती. त्यापैकी मुद्दा क्र.८ ची माहिती वगळता इतर माहिती प्राप्त झाली, मात्र मुद्दा क्र.८ मधील पाणी पुरवठा विभाग शासनाकडून कोणत्या अटी व शर्तीनुसार कोल्हापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला, तसेच त्यावेळी झालेला कार्यालयीन प्रस्ताव, करार पत्र, जनरल बॉडी ठराव इत्यादींच्या छायांकित नक्कला अद्याप दिल्या नसल्याचे अपीलकर्त्याने सांगितले. सदर प्रस्ताव शोधूनही सापडत नसल्याचे व उपलब्ध अभिलेखानुसार पूर्ण माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. संबंधित प्रस्ताव सन १९९२ पूर्वी झालेला असून त्यावेळी आपले कार्यालय अस्तित्वात नव्हते. सर्व अभिलेखांचा सखोल शोध घेऊनही कार्यालयीन प्रस्ताव आढळत नाही, महासभेचा ठराव सापडला, ती माहिती अपीलकर्त्यास दिली आहे, असेही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता, तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन पाहता मुद्दा क्र.८ मधील कार्यालयीन प्रस्तावाचा शोध घेण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मुद्दा क्र.८ मधील कार्यालयीन प्रस्तावाबाबत तत्कालीन संबंधित कर्मचाऱ्यांकडे चौकशी करून ही प्रत मिळवून देण्याचा प्रयत्न करावा.

पुणे
दि. 22.७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३९ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. जवाहरलाल महादेव चव्हाण<br>ऐ-३-१६२, मंत्री चंडक पार्क,<br>विजापूर रोड, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर अभियंता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (स),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

नगर अभियंता यांनी पदाचा कारभार स्वीकारल्यापासून सोलापूर शहरात किती लोकांना बांधकाम परवाने देण्यात आले त्याची नावासह, पत्यासह व विभागासह माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

माहिती विस्तृत असल्यामुळे उत्तरास विलंब झाला. अपीलकर्त्यास शुल्क भरून माहिती घेऊन जाणेबाबत कळविले. परंतु अपीलकर्त्याने पुन्हा संपर्क साधला नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. अपीलकर्त्याने शुल्क भरून माहिती प्राप्त करून घ्यावी.

पुणे
दि. ७.७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| | | | उपस्थिती |
| १ | अपील क्रमांक | ३४१/ कोल्हापूर | |
| २ | अपीलकर्ता | श्री. विजय यशवंत घाडगे,<br>संघटना दिल्ली) ७१८ क/ख, ए,<br>संभाजी नगर, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर सचिव, कोल्हापूर महानगरपालिका,<br>जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका<br>जि. कोल्हापूर | हजर |

महानगरपालिका, कोल्हापूर येथे नागरिकांना मुख्य इमारतीमध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सकाळी १० ते दुपारी २ पर्यत प्रवेश दिला जात नाही, त्याबाबत कोल्हापूर महानगरपालिकेच्या नियमामध्ये अशी तरतूद आहे काय, व असा आदेश देण्याचा अधिकार प्रशासनास आहे काय, याचा तपशील अपिलकर्ता श्री. विजय यशवंत घाडगे यांनी मागितला होता. जन माहिती अधिकाऱ्यांनी मुदतवाढ मागितली व नंतरही योग्य माहिती दिली नाही, म्हणून श्री. घाडगे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे अपील केले. माहिती लेखी स्वरूपात सात दिवसांत देण्याबाबत अपिलीय प्राधिकारी यांनी आदेश दिले. त्यावर पुन्हा दि. ५.३.२००८ च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी पूर्वीचेच उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांनी माहिती व्यवस्थित व सुस्पष्टपणे दिली नाही, तसेच अशा प्रकारचे आदेश म्हणजे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २४(१) नुसार मानवी हक्काविरूध्द आहेत, असे श्री. विजय यशवंत धाडगे यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात म्हटले आहे.

प्रवेशाबाबत नियमात तरतूद नसल्याचे कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.०१.०८ च्या पत्राद्वारे स्पष्ट केले आहे. म्हणजेच मूळ अर्जातील प्रश्नांचा खुलासा केला आहे. प्रशासनास असा अधिकार आहे काय, याबाबत खुलासा न दिल्याने श्री. घाडगे यांनी अपील केले आहे.

वास्तविक सदरची बाब ही तक्रार स्वरूपाची असून महानगरपालिका प्रशासनाशी सबंधित आहे. मात्र त्याबाबतची स्पष्ट माहिती नागरिकांना मिळाली पाहिजे. प्रवेशाबाबतचे संबंधित आदेश मानवी हक्काविरूध्द असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरावरून दिसत नाही.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य.

२) प्रशासनास असलेल्या प्रवेशविषयक अधिकाराबाबतची स्पष्टीकरणात्मक माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर सचिव, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी द्यावी.

**पुणे**
**दि. ३१ .०७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ३४५ / कोल्हापूर | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. अशोक रामचंद्र रणदिवे<br>मु.पो. नेसरी, ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी,<br>ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गट विकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती<br>गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | हजर |

५ <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

१. मौजे नेसरी येथे १९९० ते मार्च २००७७ अखेर एकूण किती घरकुले मंजूर झाली, प्रत्येक वर्षी मंजूर झालेल्या घरकुलांची संख्या, लाभार्थींचे नाव, त्याला दिलेली रक्कम, घरकूल पूर्ण केलेली तारीख, त्याचबरोबर शौचालय पूर्ण झालेली तारीख व दिलेली रक्कम याची माहिती

२. सन १९९० ते मार्च २००७७ अखेर एकूण बांधलेल्या शौचालयांची संख्या, तसेच प्रत्येक वर्षी जे लाभार्थी निवडले त्यांचे नाव व त्यांना आदा केलेली अनुदानाची रक्कम, तसचे जुने संडास नवीन आहेत असे भासवून किती शौचालयावर अनुदानाची रक्कम खर्ची पडली आहे, त्या लाभार्थींची नावे, साल व त्यांना सूचक असलेल्या ग्रामपंचायत सदस्यांची नावे व बोगस खर्च टाकलेल्या अनुदानाची रक्कम वसूल करणेसाठी ग्रामपंचायतीने केलेल्या प्रयत्नांची संपूर्ण माहिती

मौजे नेसरी, ता. गडहिंग्लज, येथील सन १९९० ते २००७ दरम्यान मंजूर झालेली घरकुले, शौचालये या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री. अशोक रामचंद्र रणदिवे यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेसरी, ता. गडहिंग्लज यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी, ता. गडहिंग्लज श्री. रविंद्र कांबळे यांनी

माहिती देण्याची टाळाटाळ जाणीवपूर्वक केली. माहित ४३ दिवस विलंब केल्याने ते शास्तीस पात्र आहेत, असे दि. ३१.३.२००८ रोजीच्या सुनावणी आदेशात अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी वर्ग-१ श्री. परिक्षित यादव यांनी नमूद केले. त्यानंतर दि. १.७.२००८ रोजी माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे समक्ष लिहून दिल्याचे श्री. रणदिवे यांनी आयोगाला पत्राद्वारे कळविले आहे. कोणतीही तक्रार राहिली नसल्याचे त्यामध्ये नमूद केले आहे.

उपलब्ध कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी, ता. गडहिंग्लज यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयानंतर अपीलकर्त्यास माहिती दिली, हे स्पष्ट होते. मूळ अर्ज दि. १५.१२.२००७ रोजी केलेला असून माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने दि. १.७.२००८ रोजी नमूद केले आहे. माहिती देण्यास ४३ दिवस विलंब झाल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी , वर्ग-१, पंचायत समिती, गडहिंग्लज श्री. परिक्षित यादव यांनी त्यांच्या निकालपत्रात म्हटले असून त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत नेसरी, ता. गडहिंग्लज श्री. रविंद्र कांबळे यांना जबाबदार धरले आहे. संबंधित कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे आपण मुदतीत माहिती देऊ शकलो नाही, असे जन माहिती अधिकारी श्री. रविंद्र कांबळे यांनी नमूद केले. विहित मुदतीनुसार दि. १४.१.२००७ पर्यंत माहिती द्यावयास हवी होती, व दि. १.७.२००८ रोजी दिली. हा कालावधी विचारात घेतला तर माहिती देण्यास १६६ दिवसांचा विलंब झाल्याचे स्पष्ट होते. कागदपत्रे संकलित करण्यास लागलेला कालावधी लक्षात घेता काही दिवसांची मुदत मान्य केली तरी संपूर्ण विलंब समर्थनीय ठरत नाही. त्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेसरी, श्री. रविंद्र कांबळे हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती विलंबाने दिल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी यांनी निकालपत्रात नमूद केलेला ४३ दिवसांचा विलंब गृहीत धरून व उर्वरित कालावधी क्षमापित करून जन माहिती अधिकारी तथा

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, नेसरी यांना रू. १०,७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २००८ या तीन महिन्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, वर्ग १, पंचायत समिती, गडहिंग्लज यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. 22 .७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.६.२००८ रोजी आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता:

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:३४५/सोलापूर/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.मुकुंद डोंगरी काटे<br>आवसे वस्ती, देगांव रोड, सोलापूर |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :सहाय्यक आयुक्त (स),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर |

अपीलकर्ता यांनी मौजे आवसे वस्ती, आमराई येथे सन १९९७ ते २००६ मार्चपर्यंत केलेल्या गटारी, रोड, फरशीकरण, संडास इत्यादी कामांची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. काही माहिती पूर्वीच देण्यात आली होती.

अपीलकर्त्यास हवी असलेली ऊर्वरित माहिती समक्ष देण्याचे वरील तीनही घटकांमधील चर्चेत जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले. त्याप्रमाणे आपण महानगरपालिकेमध्ये जाऊन माहिती घेतली असून त्याबद्दल समाधानी आहोत, असे निवेदन अपीलकर्ता यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. २.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, **पुणे-४११ ००१**

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४७ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ईश्वर अंकुश शेलार<br>निराळे वस्ती, गौरा नगर, सोलापूर | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (वि)<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. ईश्वर अंकुश शेलार यांनी अनधिकृत व अधिकृत खोकेधारकांच्या यादीचा तपशील, तसेच अधिकारी व कर्मचारी भ्रष्ट असल्याचा आरोप करून त्यांच्याबाबतही माहिती जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. आपण महानगरपालिकेमध्ये जाऊन सर्व माहिती घेतली असून त्याबद्दल समाधानी आहोत, असे निवेदन अपीलकर्ता यांनी आयोगाला सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .०६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३६५/ कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. राजाराम शंकरराव थारवट<br>द्वारा जयंती सायझर्स, १८/२०८, स्टेशन रोड,<br>आवळे पेट्रोल पंपाचे मागे, इचलकरंजी,<br>जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, विभागीय कार्यालय, इचलकरंजी जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता, इचलकरंजी, स्टेशन रोड, मानस हॉटेल समोर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. राजाराम शंकरराव थारवट यांनी इचलकरंजी शहरातील भारनियमन व लाईन मंजुरीबाबत, तसेच एम.एस.ई.बी. आयोगाचा तपशील या संदर्भात १ ते १० मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली होती. मात्र अपिलीय प्राधिकारी यांनी पूर्ण समाधानकारक माहिती दिल्याचे अपीलकर्त्याने सांगितले. तसेच तक्रार राहिली नसल्याचे स्पष्ट प्रतिपादन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 22.७.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे १.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपिल निर्गत कार्यक्रम दि.९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४८/ कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. आंबादास पारिसा देशमुख<br>मु. पो. नेर्ली. ता. करवीर. जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार करवीर,<br>ता. करवीर, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, तहसील करवीर जि. कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री आंबादास पारिसा देशमुख यांनी श्री. ज्ञानदेव दत्तू ढाले, रा. नेर्ली, ता.करवीर, यांच्या जातीच्या दाखल्याबाबत उपविभागीय अधिकारी, करवीर यांच्या दि.२२.०१.२००८ च्या आदेशास अनुसरून सबंधितांवर तारीख व वार या तपशिलासह केलेल्या कार्यवाहीची माहिती व अनुषंगिक आदेश / पत्रव्यवहार यांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, करवीर जि. कोल्हापूर यांच्याकडे मागितल्या होत्या. कार्यवाही अद्याप प्रलंबित असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी कळविले. सद्यस्थिती अर्जदारास कळविली आहे, तसेच प्रथम अपिलाचा निर्णय झालेला नाही. श्री. ढाले यांनी दिशाभूल करून दाखला प्राप्त केल्याच्या तक्रारी संदर्भात तहसीलदार, करवीर यांच्यामार्फत कार्यवाही सुरू असल्याचे उभय बाजूंनी नमूद केले. अशा कार्यवाहीची बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कक्षेत येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसांत कार्यवाही पूर्ण करण्याचे आश्वासन लेखी दिले.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) तहसीलदार, करवीर, यांच्यापुढील सदर प्रकरणाची कार्यवाही पूर्ण झाल्यावर अपीलकर्त्यास माहिती सशुल्क द्यावी.

**पुणे**
**दि. २१ .०७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५१ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. सादीक सत्तार हसन जमादार<br>१०/१०३७, सम्राट अशोक नगर,<br>इचलकरंजी, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सचिव, सम्राट अशोकनगर ग्राहक सहकारी संस्था मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | हजर |

सम्राट अशोकनगर ग्राहक सहकारी संस्था मर्या., इचलकरंजी, जि. कोल्हापूर या संस्थेस शासकीय अर्थसहाय्य किती मिळाले, किती हप्ते थकित आहेत, किती रक्कम फेडली आहे, १९९७ ते २००६ पर्यंतचे ऑडिट रिपोर्ट, निवडणूक कार्यक्रम इ. माहिती अपीलकर्ता श्री. सादीक सत्तार हसन जमादार यांनी मागितली होती. माहिती संस्था स्थरावरील असल्याचे नमूद करून जन माहिती अधिकारी तथा सचिव, सम्राट अशोकनगर ग्राहक सहकारी संस्था मर्या., इचलकरंजी यांनी अर्ज संस्थेच्या सचिवांकडे पाठविला. सचीव आजारी असल्यामुळे माहिती देता आली नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. पंधरा दिवसांत सर्व माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी तथा सचिव, सम्राट अशोकनगर ग्राहक सहकारी संस्था मर्या., इचलकरंजी श्री. दिलीप मुथा यांनी कबूल केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क देऊन पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा. अपिलीय प्राधिकारी यांनी ही कार्यवाही पूर्ण करण्याची दक्षता घ्यावी.

पुणे
दि. 22.७.२००८

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**